महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# जाहीर सुचना

**विषय : कोल मिल मधुन नाकारण्यात आलेल्या टाकावु कोळश्याची मान्यताप्राप्त लघुउद्योजकाकरीता खुली विक्री.**

**खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात कोल मिल मधून नाकारण्यात आलेल्या टाकावु कोळश्याचे ई–लिलावाद्वारे विक्री खालील प्रमाणे करण्यात येत आहे.**

| ई–लिलावाची तारीख | विक्री साठी टाकावू कोळसा (मे.टन) | २० टक्के लघुउद्योजका करीता राखीव (मे.टन) | GST & Compensation Cess |
|---|---|---|---|
| २६.०४.२०२४ | लॉट १ – ४०००० मे.टन<br>लॉट २ – ४०००० मे.टन | लॉट १ – ८००० मे.टन<br>लॉट २ – ८००० मे.टन | GST ५ टक्के व भरपाई सेस रुपये ४०० प्रति मे. टन लागु राहतील. |

१) वर दर्शविलेल्या प्रमाणे प्रत्येक लॉटच्या एकूण मालाच्या २० टक्के, एकूण सुमारे ८००० मे.टन टाकावु कोळसा हा फक्त लघुउद्योजकासाठीच ई–लिलावाच्या दिवसापासुन ३० दिवसापर्यंत राखीव ठेवण्यात आला आहे.

२) ज्या मान्यताप्राप्त लघुउद्योजकांना वरील टाकावू कोळश्याची पाहाणी करायची असेल त्यांनी खालील दिलेल्या नंबर वर संपर्क करावा

श्री. नितीश पडोळे (कार्यकारी अभियंता)–९४२२५७४३३३
श्री. विनोद राठोड (अति. कार्यकारी अभियंता)–९४२१००५२६०

३) ज्या मान्यताप्राप्त लघुउद्योजकांना वरील टाकावू कोळसा विकत घेणे असेल त्यांनी मुख्य अभियंता (नि.स.व.सु) खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा यांच्याकडे आपली मागणी मे.टना मध्ये लिहुन व त्यासोबत योग्य ते प्रमाणपत्रे जोडून आपले अर्ज दि. २५.०४.२०२४ ला दुपारी ०५.०० वाजेपर्यंत ज्या लॉटमधील टाकावु कोळसा हवा असेल त्या लॉटचा स्पष्ट उल्लेख करुन अर्ज जमा करावित.

४) कस्टमर बनविण्याकरीता PAN किंवा GST रजिस्ट्रेशनची प्रत.

५) सदर इच्छुक लघुउद्योजकांचे अर्ज आल्यानंतर २० टक्के राखीव टाकावु कोळसा विकल्या गेलेल्या लॉटप्रमाणे सर्व इच्छुक अर्जदारांना देण्यात येईल.

६) लघुउद्योजकांसाठीचा २० टक्के राखीव असलेला टाकावु कोळसासाठी मागणी आली नसल्यास राखीव मालातील उर्वरित टाकावू कोळसा दि. २६.०४.२०२४ नंतर ई–लिलावातील यशस्वी ठेकेदारास देण्यात येईल.

७) लघुउद्योजकासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या २० टक्के मालासाठी जर दिलेल्या मुदतीपर्यंत कोणाचेही अर्ज आले नसल्यास संपुर्ण १०० टक्के कोळसा ई–लिलावातील यशस्वी ठेकेदारास देण्यात येईल.

८) सदर टाकावू कोळशाचे दर हे ई–लिलावाद्वारे लॉटप्रमाणे यशस्वी झालेल्या ठेकेदाराच्या खरेदीच्या आदेशातील दर असेल.

९) लघुउद्योजकांनी त्यांना देण्यात आलेला टाकावु कोळसा ई–लिलावापासुन ३० दिवसातच उचलावा.

१०) लघुउद्योजकांनी त्यांना निर्धारित करण्यात आलेल्या टाकावू कोळशाच्या रकमेच्या १० टक्के सुरक्षितता ठेव ई–लिलावापासुन १० दिवसाच्या आत भरणे आवश्यक आहे.

११) लघुउद्योजकांनी त्यांना निर्धारित केलेला टाकावु कोळसा पुर्णपणे उचलल्या नंतर व विभागास ना–हरकत प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सुरक्षितता ठेव परत करण्यात येईल. सदर ठेवीवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१२) यदाकदाचीत जर लघुउद्योजकांनी, त्यास निर्धारित करण्यात आलेल्या माला एवढी उचल, वेळेच्या आत केली नसल्यास अथवा आदेशातील कोणत्याही नियम व अटींचे उल्लंघन केले असल्यास त्यांना १५ दिवसाच्या आत सूचना देवून त्यांची सुरक्षितता ठेव जप्त करण्यात येईल.

**टीप:** लघुउद्योजकांनी अर्ज करतांना त्यात अर्जदाराचे नाव, संपुर्ण पत्ता, फोन नं. / मोबाईल नं. विट भटटी लघुउद्योजक असल्याचा दाखला व संबधित कागदपत्रे, मागणी असलेला टाकावू कोळसा अक्षरी व अंकी मे.टन मध्ये व लॉटचा क्रमांक नमुद करावा.

**Sd/-**
**मुख्य अभियंता (नि.स.व.सु.)**
**म.रा.वि.नि.कं.मर्या. खा. औ.वि.के. खापरखेडा**